# नौपाडा वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/९६० /२०२५ दि.१३ /०८/२०२५

–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** नौपाडा वाहतूक उप विभागाचे हद्दीत दिनांक १६/०८/२०२५ रोजी **'गोपाळकाला'** सणानिमित्त दहिहंडीचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच सदर कार्यक्रमात मोठया संख्येने गोविंदा पथक सहभागी होणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) पूर्व द्रुतगती महामार्गावरून कोपरी ब्रिज, तीन हात नाका, धर्मवीर नगर नाका, नितीन कंपनी नाका येथून ठाणे शहरात (वंदना बस स्टॉप–स्टेशनबाजूस) येणाऱ्या एस.टी, टीएमटी ,बीईएसटी व खाजगी बसेसना नमूद नाका येथून आत येण्यास व ठाणे स्टेशन कडून वर नमूद नाकामार्गे जाण्यास **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरच्या सर्व बसेस कॅडबरी नाका–खोपट नाका–आंबेडकर रोडने जी.पी.ओ. नाक्या वरुन कोर्ट नाका – डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा – जांभळी नाका भाजी मार्केट मार्गे ठाणे पश्चिम स्टेशन व पुढे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) सर्व गोविंदा पथकाच्या वाहनाना कोपरी ब्रिज नाका, तीन हात नाका, धर्मवीर नगर नाका, नितीत कंपनी नाका, कॅडबरी नाका येथून ठाणे शहराच्या अंतर्गत भागात व स्टेशन बाजूस जाणाऱ्या वाहनांस नमूद नाक्यांवर **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची सर्व वाहने पूर्व द्रुतगती महामार्गालगतच्या दोन्ही बाजूचे सर्व्हिस रोडवर पार्किंग करण्यात येतील.

**नो पार्किंग –** **अ)** ठाणे महानगरपालिका भवन ते अल्मेडा चौक ते महापालिका भवन ते ओपन हाऊस – आराधना क्रॉस, ओपन हाऊस ते भक्ती मंदिर रस्त्याचे दोन्हीबाजूस सर्व प्रकारच्या वाहनांना**'नो पार्किंग'**करण्यात येत आहे.

**ब)** टॉवर नाका – गडकरी रंगायतन – बोटींग क्लब पर्यंत मासुंदा तलावाचे (तलावपाळी) रोडचे दोन्ही बाजूस सर्व प्रकारच्या वाहनांना **'नो पार्किंग'** करण्यात येत आहे.

**सदरची अधिसुचना दि. १६/०८/२०२५ रोजी सकाळी ०६:०० वा. पासुन ते रात्रौ २४.०० वाजे पावेतो अंमलात राहील.**

सदरची अधिसुचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी,ठाणे.

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे.

मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई–विरार महानगरपालिका.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग व वाहतूक उप विभाग ठाणे शहर.